## पडताळणी

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३३/२०२६** **निशाणी क्र.५**

तक्रारदार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची पडताळणी,

मी देवाच्या नावाने शपथ घेतो की मी जे सांगेन ते सत्य असेल,

संपूर्ण सत्य असेल आणि सत्याशिवाय दुसरे काहीही नाही.

माझे नाव : शिवशंकर मनोहर हिंगमिरे,

माझे वय : ३५ वर्षे, धंदा : शेती,

राहणार : शंभु उमरगा, ता. उदगीर, जि. लातूर.

रामलिंग शिवराज पाटील हा आमचा सोयरा आहे. त्यांना भूखंड घ्यायचा होता. त्याकरिता त्यांनी माझ्याकडे माहे डिसेंबर २०२४ मध्ये हातउसणे रु.४,००,०००/– ची मागणी केली. आमच्यातील सोयरे संबंध तसेच त्यांची अडचण विचारात घेऊन मी त्यांना दि.०७.०१.२०२५ रोजी रु.४,००,०००/– रोख स्वरुपात दिले. सदर रक्कम ८ ते ९ महिन्यांसाठी हातऊसनी दिली होती. सदर ८–९ महिन्यानंतर मी त्यांना त्या रकमेची मागणी केली असता त्यांनी सुरुवातीला थोडे थांबण्याची विनंती केली व सरतेशेवटी दि.१२.११.२०२५ रोजी सदर थकीत रकमेच्या परतफेडीपोटी मला दि.१३.११.२०२५ टाकून धनादेश क्र.४८५२४७ हा भारतीय स्टेट बँक, शाखा शिरुरु अनंतपाळचा रु.४,००,०००/– चा दिला. सदर धनादेश मी मुदतीत वटण्यासाठी एल.डी.सी.सी. बँक शाखा शंभु उमरगा येथील बँकेत टाकला असता तो न वटता ''अपुरा निधी'' या कारणाने दि.२०.११.२०२५ च्या मेमोने परत आला. त्यानंतर दि.१०.१२.२०२५ रोजी आरोपीला नोटीस पाठवुन सदर धनादेशाच्या रकमेची मागणी केली. सदर नोटीस आरोपीने दि.११.१२.२०२५ रोजी स्वीकृत केली. त्याने सदर नोटीसला उत्तर दिले परंतु सदर धनादेशाची रक्कमही भरली नाही. त्यानंतर मी प्रस्तुत तक्रार न्यायालयात दाखल केली आहे. तरी, माझे पैसे आरोपीकडून मिळावेत व त्यास नियमाप्रमाणे शासन व्हावे.

समक्ष,

(निवेदकाची स्वाक्षरी)

१७.४.२०२६

(भालचंद्र रा. झेंडे)

दिनांक : १७.०४.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्या.क्र.३), उदगीर.